# चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
## वार्षिक अहवाल - २०२० - २१

आत्तापर्यंत यशस्वी वाटचाल करीत चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. एन.सी.टी.ई च्या २०१४ च्या नियमानुसार बी.एड. कोर्स सध्या तरी दोन वर्ष कालावधीचा असून यात चार सत्रांचा समोवश आहे. लेखीपरीक्षा प्रमाण ६०% असून ४०% प्रात्यक्षिक परीक्षेवर भर देण्यात आला आहे. त्याच बरोबर आंतरवासिता कालावधीस जास्त प्राधान्य देण्यात आले आहे. आंहर वासिता दुसऱ्या सत्रात तीन आठवडे, तिसऱ्या अकरा आठवडे आणि चौथ्या सत्रात पाच आठवडे असा कालावधी झाला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात व बदललेल्या परिस्थितीमध्ये ही मराठी माध्यमांच्या कॉलेजात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जरी कमी होत असली तरी आपल्या महाविद्यालात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पूर्ण क्षमतेत आहे. या वर्षी तर कोरोनासारख्या महामारीच्या काळातही बदलत्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारुन महाविद्यालयाची खंबीरपणे प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे.

अ) **विविध उपक्रमां संदर्भात :** आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच सर्वांगिण विकास व्हावा, बाहेरील स्पर्धात्मक समाजात त्यांच्या टिकाव लागावा यासाठी विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले.

१) १ जून २०२० रोजी भावी शिक्षकांमध्ये पर्यावरणाची जाण निर्माण व्हावी या हेतूने श्री मराठे, इंडोनेशिया Saving the World यांचे या विषयांवर वेबीनारचे आयोजन केले गेले.

२) ६ जून २०२०, रोजी डॉ. जयेश जाधव यांनी यांनी Job Creation through Digitial Revolution या विषयावर कार्यशाळा घेतली.

३) दिनांक २० जून २०२० रोजी डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी अष्टांग योग या विषयावर चर्चासत्र घेतले.

४) दिनांक २४ ऑगस्ट २०२० रोजी डॉ. उमाकांत देशमुख यांनी Video Making या विषयांवर कार्यशाळा घेतली.

५) दिनांक २९ ऑगस्ट २०२०, डॉ. जयेश जाधव यांना PPT to Video Conversion या विषयांवर कार्यशाळा घेतली.

६) दिनांक २९ ऑगस्ट २०२०, रोजी डॉ. उमाकांत देशमुख यांनी E-content Development या विषयावर व्याख्यान दिले.

७) दिनांक २९ ऑगस्ट, २०२० रोजी डॉ. चद्रशेखर चक्रदेव यांनी Yoga psychology या विषयावर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान दिले.

८) दिनांक २१ सप्टेंबर २०२० रोजी डॉ. जयेश जाधव यांनी How to download copyright free Image या विषयावर कार्यशाळा घेतली.

९) दिनांक ३० सप्टेंबर २०२०, रोजी डॉ. जयेश जाधव यांनी How to uplod / paste scanned PDF Document in google from या विषयावर कार्यशाळा घेतली.

१०) दिनांक २६ नोव्हेंबर २०२२० संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी प्रा. डॉ. अशिष बोरखे यांच्या व्याख्यानाचा आस्वाद सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक यांनी घेतला.

११) दिनांक ६ जानेवारी ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत महाविद्यालयातील सर्व प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक वर्ग यांना MPC Online Training programee, CSR Mahindra Pride Class room तर्फे प्रशिक्षण देण्यात आले.

१२) दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयातील महिलाविकास कक्ष व अहान फाऊंडेशन टीम नेटीसम यांच्या सहाय्याने सायबर सखे हा कार्यक्रम घेण्यात आला.

१३) दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयातील महिलाविकास कक्षा तर्फे in Service Traders साठी Building Digital Guardians हा कार्यक्रम घेतला गेला.

प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
आर. सी. मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई-४०००७१.

Chembur Sarvankash Shikshanshastra Mahavidyalaya
Mumbai
400 071.
Chembur

१४) दिनांक २ एप्रिल २०२१, रोजी चें. स.शि.म. श्री. जयेश शिंदे, श्रीमती मिना सालढाना, मिस ग्लॉडी गोल्सान्वीस यांनी आपल्या प्रशिक्षणार्थ्यांना Certificate Cours for Teacher Education in International School या बद्दल उद्‌बोधन केले.

१५) बहाई ॲकडमी, पाचगणी यांच्या तर्फे दिनांक ६ ते ११ मार्च २०२१ या कालावधीत ६ दिवसांची Self Development & Capacity Building for Teachers या संदर्भात कार्यशाळा घेतली गेली.

१६) अहवाल काळात डॉ. चक्रदेव, डॉ. कुसुम चौधरी, डॉ. देशमुख, डॉ. केशर जाधव व डॉ. जयेश जाधव यांनी विविध शैक्षणिक विषयावर FDA पूर्ण केले.

ब) शैक्षिणक वर्ष २०२०-२१ या मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अशाप्रकारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी घेण्यात आलेले ऑनलाईन विविध उपक्रम शिक्षणविषयक कार्यशाळा यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तेत सातत्याने भर घातली. महाविद्यालयात अशा प्रकारे दिवसें दिवस प्रगती करीत आहे. कोविड-१९ च्या परिस्थिती मध्ये ही वाट जरी बिकट असले तरी वेळोवेळा व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या सहकार्यामुळे ही सुकर होत गेली. चेंबूर एज्युकेशन सोसायटी सर्व घटक पूर्व प्राथमिक विभाग, प्राथमिक विभाग, माध्यमिक विभाग आणि रात्र शाळा यांचे सहकार्य महाविद्यालयास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नेहमीच मिळत असते. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचा न दिसून येणारा, परंतु वास्तविकेत असणारा मोठा वाटा या प्रगती मागे असतो. वेळोवेळी दिलेली सर्व जबाबदारी पूर्ण त्वास नेणारे प्राध्यापक मंडळी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक वर्ग यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मिळणारे सहकार्य महाविद्यालयास यशाच्या प्रगतीपथावर घेवून जाते या सर्वांच्या सहकार्या बद्दल मी शतशः आभार व्यक्त करतो.

सर्व प्राध्यापक , आजी-माजी विद्यार्थी व पालक वर्ग यांच्या सहकार्याबद्दल शतशः आभार

डॉ. चंद्रशेखर चक्रदेव
(प्रभारी प्राचार्य)

प्राचार्य
चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय
आर. सी. मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर, मुंबई-४०००७१.